# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ०५ मार्च, २०२६ / फाल्गुन १४, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

**मुंबई महानगरपालिकेने " ई" विभागातील कामांकरिता राबविण्यात आलेल्या पारंपारिक निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(१)** * **२५३७७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने "ई" विभागात सुरु असलेल्या कामांकरिता राबविण्यात आलेल्या ई–निविदांमध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी.पी.पी) धोरणाची अंमलबजावणी न करता पारंपारिक पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षता कार्यालय, मुख्य अभियंता (रस्ते) कार्यालय व मटेरियल टेस्टिंग लॅब, इमारत पुनर्विकास या कामांच्या ई-टेंडर प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या धोरणानुसार निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक असताना त्याचे उल्लंघन करुन निविदा क्रमांक २०२५ MCGM – ११७०२२५ = १ ने राबविण्यात आली असून लोकप्रतिनिधीनी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार करुन सदर निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करुन महानगरपालिकेच्या सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी.पी.पी.) धोरणानुसार नव्या निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) एस. के. आहिरे मार्ग, जी / दक्षिण प्रभागातील लोअर परळ विभागातील भूकर क्र. १६२९ (अंशतः) या भूखंडाचा पुनर्विकास करून त्याठिकाणी प्रमुख अभियंता (दक्षता) आणि प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतुक) यांच्या कार्यालयांचे व 'साहित्य चाचणी प्रयोगशाळा' उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया ईपीसी / टर्नकी तत्वावर महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार सुरु केली होती.

प्रशासकीय निर्णयानुसार ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ च्या पत्रान्वये याबाबत विचारणा केली असून, निविदा प्रक्रिया रद्द केल्याबद्दल त्यांना दि. १६ फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रान्वये महापालिकेद्वारे कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधकाम प्रकल्पांवर**
**वायू प्रदुषण मापन संयंत्रे बसविण्याबाबत**

**(२) * २३५५३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या पर्यावरण व हवामान बदल विभागाने निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार बांधकाम स्थळांवर बसविण्यात येणाऱ्या वायु गुणवत्ता सेन्सर्सबाबत अनुपालन, कारवाई किंवा खर्च याबाबतची कोणतीही माहिती विभागाकडे उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकामातील धूळ ही प्रदूषणाच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण असूनही याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईची हवा प्रदूषित होण्यापासून वाचविण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. ०९ जानेवारी, २०२५ व दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, सर्व चालू असलेल्या बांधकाम प्रकल्पांवर वायु प्रदूषण मापन संयंत्रे, एल.ई.डी. फलकासह बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

दि.१६ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत एकूण २२२४ बांधकाम प्रकल्पांपैकी १९५२ ठिकाणी वायू प्रदूषण मापन संयंत्रे बसविण्यात आली आहेत. तसेच निर्णय आधार प्रणाली (DSS) चालू करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वायू प्रदुषणाची पातळी नियंत्रणात आणण्यासाठी आणि प्रदूषणकारी घटकांना अटकाव करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे 'मुंबई वायु प्रदूषण शमन योजना २०२३' प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. वायु प्रदूषण नियंत्रणाकरिता बांधकाम कंत्राटदार, बांधकाम व्यावसायिक, विकासक, महापालिका अधिकारी व विभाग स्तरावरील अधिकारी यांनी करावयाच्या उपाययोजनासंबंधी २७ मुद्यांचे 'सर्वकष मार्गदर्शक सूचना' दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी जारी करण्यात आली आहे. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी २८ मुद्यांची सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यामध्ये धूळप्रदूषण रोखण्याकरिता बांधकाम प्रकल्पाच्या सभोवताली पत्र्यांचे कुंपण उभारणे, हिरव्या कपडयांचे आच्छादन करणे, पाणी-फवारणी करणे, राडारोडयाची शास्त्रशुध्द साठवण व ने-आण करणे, बांधकामाच्या ठिकाणी वायू प्रदूषण मोजमाप करणारी यंत्रणा बसविणे व इतर महत्वाच्या उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत. सदर सर्वकष मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद उपाययोजनांची अंमलबजावणी होणेकरिता विभाग स्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आलेली आहेत व भरारी पथकांकडून मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणा-यांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.

दीर्घकालीन उपाययोजनातंर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विविध शासकीय यंत्रणा आणि भागधारकांशी समन्वय साधणे, यामध्ये रस्त्यांची गुणवत्ता सुधारणे, मेट्रोच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतूक सेवा वाढविणे आणि शाश्वत नागरी वाहतुकीला प्रोत्साहन देणे यासारख्या बाबी अंतर्भूत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील लाकूड / कोळसा आधारीत एकूण ३५४ पावभट्टयांचे तसेच स्मशानभूमीमधील दाहिन्या ह्या पाईपलाईन नॅचुरल गॅस/विद्युत अशा स्वच्छ इंधनावर रुपांतरित केल्या आहेत. सार्वजनिक वाहतूकीकरीता बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात इलेक्ट्रीक बसेस वापर करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेशाचे वायू प्रदूषणाचे स्त्रोत ओळखून उत्सर्जन सूची अद्ययावत करण्यासाठी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया' (एआरएआय) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नागपूर येथे कचरा वाहक कंटेनरखाली येऊन एका कामगाराचा झालेला मृत्यू

**(३) * २५४४८ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरा संकलनाचे काम दिलेल्या एजी इन्व्हायरो या कंपनीचे वाहन कचरा संकलन करून भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये कंटेनर रिकामे करताना कंटेनरखाली येऊन श्री. सिद्धार्थ घोडके या कामगाराचा मृत्यू झाल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची माहिती इतर कामगारांना कळताच त्यानी कामबंद आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीच्या वतीने कामगारांच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेत नसल्यामुळे निरपराध कामगारांचा बळी जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित कंपनीविरुद्ध कारवाई करण्यासह मृत व्यक्तीच्या कुटुबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

मे. ए.जी. इन्व्हायरो इन्फ्रा.प्रो.लि. या कचरा संकलन करणाऱ्या एजन्सीमध्ये कार्यरत श्री.सिध्दार्थ घोडके यांचा बुधवार बाजार येथे कंटेनर रिकामे करतांना झालेल्या दुर्घटनेमध्ये मृत्यू झाला आहे

(२) हे खरे आहे,

एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी दि.१९ जानेवारी, २०२६ रोजी १ दिवस काम बंद आंदोलन केले होते.

(३) एजन्सीद्वारे कामगारांना व्यक्तीगत सुरक्षा साहित्य (गणवेश, हातमोजे, जुते, रेनकोट इ.) उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच एजन्सीव्दारे कामगारांना कर्मचारी राज्य वीमा महामंडळ, आरोग्य बीमा, भविष्य निर्वाह निधी, सेवा उपदान विहित नियमानुसार लागु करण्यात आले आहेत.

(४) सदर प्रकरणी दि.१८ जानेवारी २०२६ रोजी पोलीसांद्वारे घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे. सदर प्रकरणी सक्करदरा पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तपास सुरू आहे. एजन्सीद्वारे श्री. घोडके यांच्या पत्नी श्रीमती रश्मी घोडके यांना रु.१५ लक्ष व आई श्रीमती छाया घोडके यांना रु.५ लक्ष रकमेची आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच मयत कामगाराच्या कुटुंबियांना विम्याची रक्कम देण्याबाबत कर्मचारी राज्य वीमा महामंडळ मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये उद्याने बांधण्यासाठी अतिरिक्त निधी दिल्याबाबत

**(४) * २३३६० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाचे पंतप्रधान यांच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये एक उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेतला असून प्रत्येक उद्यानासाठी १ कोटी प्रमाणे ३९४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून त्या उद्यानांना 'नमो उद्यान' असे नाव देण्याची घोषणा करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने विकसित झालेल्या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषदा / नगरपंचायतींना बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी आणि तृतीय क्रमांकासाठी १ कोटी असा अतिरिक्त विकास निधी म्हणून विजेत्यांना देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याचे सदय:स्थितीतील कर्जाची रक्कम जवळपास १० लाख कोटीं रुपयांवर गेली असून अशा प्रकारे अतिरिक्त खर्च शासनाने कोणत्या शिर्षकातंर्गत केला आहे,

(४) तसेच अशा नव उद्यानांतून नगरपरिषदा/ नगरपंचायतींना महसूल मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विकसित करण्यात आलेल्या नमो उद्यांनाची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून सदर स्पर्धेतून प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत तीन उद्यानांची निवड करण्यात येईल प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त नगरपरिषद / नगरपंचायतीस अनुक्रमे रु.५.०० कोटी, रु.३.०० कोटी व रु.२.०० कोटी निधीची कामे वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणार आहेत.

(३) वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत सदर कामासाठी लेखाशीर्ष २२१७ १३०१ खालील अर्थसंकल्पीत उपलब्ध निधीतून तरतूद करण्यात आली आहे.

(४) ज्या लेखाशिर्षांतर्गत या कामांसाठी निधीची तरतूद केली आहे, त्याच्या मार्गदर्शक सूचना/ धोरणानुसार हाती घ्यावयाची कामे नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नगरपरिषदांना आर्थिक स्वयंपुर्ण होण्यासाठी कायम स्वरुपी उत्पनाचा स्त्रोत मिळवून देण्याच्या दृष्टीने कामे हाती घेण्याची तरतूद नियोजन ही सदर धोरणामध्ये विहित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगर प्राधिकरण हद्दीचा आराखडा तयार करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(५) * २६५१७ श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्राधिकरण हद्दीचा आराखडा तयार करावा अशा सूचना राज्य शासनाने दिल्या असतानाही नगररचना विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधिकरणाने सुमारे सात हजार चौरस किलोमीटर लांबीच्या हद्दीचा विकास आराखडा तयार केला असुन त्यावरून वाद झाल्याने तो रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला व विकास आराखडा तयार करण्यापूर्वी हद्दीचा संरचनात्मक योजना तयार करावी असा निर्णय शासनाने घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संरचनात्मक योजना तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी असा प्रस्ताव प्राधिकरणाने सहा महिन्यापूर्वी शासनाला पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हद्दीचा आराखडा तयार न झाल्यामुळे प्राधिकरणाच्या हद्दीत रस्ते निर्माण करण्यास विलंब होत असल्याने त्याचा परिणाम वाहतुकीवर होत असून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पीएमआरडीए च्या हद्दीचा आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांचे क्षेत्राच्या (PMRDA क्षेत्राकरिता) संरचना योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी नगर रचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत दि.०२/०२/२०२६ रोजीने शासनास विनंती केली असून PMRDA क्षेत्राकरिता संरचना योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी नगर रचना अधिकारी म्हणून नगर रचना उपसंचालकापेक्षा कमी दर्जाचे नसलेल्या अधिकाऱ्याची नगररचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी अधिसूचना शासनाकडून लवकरच प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगर प्रदेशाची प्रारूप विकास योजना दि.०२/०८/२०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात नागरिकांच्या सूचना / हरकती करिता प्रसिध्द करण्यात आलेली होती, हे खरे आहे. तथापि, त्यावरुन मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाल्यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सभेत दि.१२ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पारित ठरावानुसार सदर प्रारूप विकास आराखडा रद्द करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला व त्यास अनुसरुन दि.२७/०९/२०२५ रोजीच्या जाहीर अधिसूचनेन्वये PMRDA प्राधिकरणाने सदर प्रसिध्द प्रारुप आराखड्यासंबंधी यापूर्वी झालेली वैधानिक कार्यवाही रद्द करून उक्त प्रसिध्द प्रारूप विकास आराखड्याची प्रक्रिया मागे घेण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांचे क्षेत्राकरिता (PMRDA क्षेत्राकरिता) संरचना योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी नगर रचना अधिकारी नियुक्ती करण्याबाबत दि.०२/०२/२०२६ रोजीने शासनास विनंती केली आहे.

सदर क्षेत्राकरिता संरचना योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी नगर रचना अधिकारी म्हणून नगर रचना उपसंचालकापेक्षा कमी दर्जाचे नसलेल्या अधिकाऱ्याची नगररचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी अधिसूचना शासनाकडून लवकरच प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगर प्रदेशाची प्रारूप विकास योजना दि.०२/०८/२०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात नागरिकांच्या सूचना / हरकती करिता प्रसिध्द करण्यात आलेली होती, तथापि, त्यावरुन मा.उच्च न्यायालयात विविध रिट याचिका दाखल होऊन काही कालावधी झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि आता, म.प्रा.नि. व न.र. अधिनियामातील सुधारित तरतुदींनुसार Structure Plan तयार करण्यात येणार आहे. सदर structure plan मध्ये पायाभूत सुविधेतंर्गत १८.०० मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे जाळे तयार करण्यात येणार आहे. सदरचा Structure Plan तयार झाल्यानंतर वाहतुक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

(५) सदर बाबत विलंब झालेला नाही.

शासनाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राचा प्रारुप विकास योजना आराखडा रद्द केल्यानंतरच्या कार्यवाहीबाबत. म.प्रा.नि. व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वयेचे निदेश दि.१०.०२.२०२६ अन्वये पारित केलेले असून त्यासह शासनाने उक्त प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये विकास परवानगी देताना अवलंबवयाच्या कार्यपद्धतीबाबत अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये निदेश देखील दि.१०.०२.२०२६ अन्वये पारित करण्यात आले आहेत.

-----------------

**पुणे शहरातील मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) * २७८०८ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :**
सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात सन २०२१ पासून सुरु करण्यात आलेले मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजनेच्या दोन टप्प्यांचे काम माहे मार्च, २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही सदरील काम अद्याप पूर्ण झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामात सुमारे ८० हजार झाडांची कत्तल करण्यात येणार असून त्यासाठी पर्यावरण विभागाचे ‘ना हरकत प्रमाणपत्र’ न घेता कामे सुरू करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे यांनी दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास प्रसिद्ध केलेल्या संशोधन अभ्यासानुसार मुळा-मुठा नदीकाठ सुधार प्रकल्पामध्ये भविष्यातील पुर पातळीचा तसेच हवामान बदलांचा योग्य पद्धतीने विचार केला गेला नसल्यामुळे भविष्यात पुणे शहराला पुराचा धोका वाढण्याची शक्यता असल्याचे नमूद केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरणीय बाबींचा विचार करून सदरील प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :**(१) अंशतः खरे आहे.

पुणे महानगरपलिका नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल (स्ट्रेच -९) याचा कालावधी ३० महिने होता. परंतू सदर कामामधील खाजगी मिळकतीच्या ताब्याबाबत, संरक्षण विभागाची, शासकीय मिळकतीच्या ताब्याबाबत, जागेवरील परिस्थिती नुसार करावे लागणारे बदल, यामुळे कामास विलंब झाला. ही वस्तुस्थिती आहे.

स्ट्रेच-९ यास प्रथम मुदतवाढ ३१/१२/२०२५ पर्यंत देण्यात आली तसेच काही विशेष बाबी मुळे व जागेवरील परिस्थितीनुसार वाढीव कामाचा कार्यादेश देऊन काम दि. ३१/०६/२०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बंडगार्डन पूल ते मुंढवा पूल (स्ट्रेच-१०-११ कामचा कालावधी ३६ महिने इतका होता. यास प्रथम मुदतवाढ ३१/१२/२०२६ पर्यंत देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सदर काम वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

वाकड बायपास ते सांगवी पूल (स्ट्रेच १, २, व ३) कामाची अंतिम मुदत १०/१०/२०२७ असून काम वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

सदर तिन्ही प्रकल्पात पर्यावरण विभागाचे ना-हरकत पत्र घेतले आहे. प्रकल्पाच्या कार्यक्षेत्राचे सर्वेक्षण केले असून, सदर प्रकल्पात ७५३९ झाडे प्रकल्पबाधित होत आहेत. पुणे महानगरपालिकेने सदर झाडे वृक्ष प्राधिकरण यांच्या सूचनेप्रमाणे निष्कासित व पुनर्रोपण दोन्ही पर्याय राबविले असून नदी पुनरुज्जीवन प्रकल्पातील कामाच्या कालावधी मध्ये आवश्यकतेनुसार नवीन वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेने सदर कामाची निविदा प्रकाशित करण्यापूर्वी सर्व स्ट्रेचसाठी डी.पी.आर. तयार करण्यात आला असून, पुणे क्षेत्र परिसराचे ५० वर्षात पडलेला पाऊस (निळी पूर रेपा) व १०० वर्षामध्ये सर्वात जास्त पडलेला पाऊस (लाल रंग पूर रेषा) प्रमाणे नियोजन करूनच नकाशे केलेले आहेत. त्यामुळे काम पूर्ण झाल्यावर पूराचा धोका शहराला होणार नाही.

(४) पर्यावरण बाबींचा विचार करुन प्रकल्प राबविण्यात येत आहे. परंतू प्रकल्पामधील अडचणीमुळे काही प्रमाणात विलंब झाला आहे. तसेच उर्वरित कामे गतीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा संवर्ग निश्चित करण्यासाठी प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत

**(७) * २३४९० श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण देण्याचा निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णयानुसार झालेला असून सदर प्राविण्यप्राप्त खेळाडूंना सुधारित शासन निर्णय राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/ क्रियुसे-२ दिनांक १ जुलै, २०१६ खेळडूंचा संवर्ग (गट-अ, ब व क) निश्चित करण्यासाठी विभागीय उपसंचालक यांचेकडून प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नवोदय विद्यालय, समिती अंतर्गत शिक्षण घेणारे विद्यार्थी राज्य, राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळविल्यानंतर त्यांचा संवर्ग (गट-अ, ब व क) निश्चित करण्यासाठी त्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठीचे अर्ज विभागीय उपसंचालक स्विकारत नसल्याने नवोदय विद्यालय समितीचे प्राविण्यप्राप्त खेळाडू नोकरीत मिळणाऱ्या आरक्षणापासून वंचित राहत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नवोदय विद्यालय, समितीचे प्राविण्यप्राप्त खेळाडू नोकरीच्या आरक्षणापासून वंचित राहू नये, खेळाडूंना त्यांचा हक्क मिळावा यासाठी संवर्ग निश्चित करणे व त्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी विभागीय उपसंचालक यांचेकडून करणेसाठी व त्यांचे अर्ज स्विकारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण देण्याबाबत दि. ०१/०७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर धोरणातंर्गत पात्र स्पर्धा व क्रीडा विषयक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/राज्यस्तरावर संबंधित विभाग/जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करुन प्रथम, द्वितीय अथवा तृतीय

स्थान/सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक आहे. यामध्ये क्रीडा विषयक अर्हतेमधील नमूद स्पर्धेमध्ये नवोदय विद्यालय स्पर्धांचा समावेश नाही.

जवाहर नवोदय विद्यालये ही केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत चालणारी निवासी शाळांची साखळी आहे. त्यामुळे नवोदय विद्यालय समिती मार्फत आयोजित विभागीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा (NVS National Meets) समावेश सदर धोरणातंर्गत नसल्याने नवोदय विद्यालयातील खेळाडू ५ टक्के आरक्षणास पात्र ठरत नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने तीन राष्ट्रीय स्पर्धांसाठी दिलेल्या निधीचा झालेला अपहार**

**(८) * २४४९१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तीन राष्ट्रीय स्पर्धांसाठी दिलेल्या १२ कोटी ४५ लाख रुपयांचा निधीचा अपहार करुन खेळाडूंना पुरविलेले निकृष्ट साहित्य दुप्पट किंमतीला खरेदी केल्याचे दाखवून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे सचिव यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ या संघटनेचे कार्याध्यक्ष यांनी पुणे येथील समर्थ पोलिस ठाणे येथे तक्रार दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गुजरात नॅशनल गेम्स करिता शासनाने ३ कोटी ५० लाख रुपयांचा निधी दिला होता, प्रत्येक खेळाडूंना ट्रॅकसूट २५०० रुपयांचा घेतल्याचा दाखविण्यात आला परंतु सदर ट्रॅकसूट बनावट कंपनीचे असून एका कंपनीकडून प्रत्येकी १२०० रुपयांना मुंबईतील विरा स्पोर्टस यांनी खरेदी केले असून सदर ट्रॅकसूट संघटनेने अजिंक्य सप्लायर्स यांच्याकडून २५०० रुपयांमध्ये खरेदी केल्याचे दाखविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने शासनाची फसवणूक करणाऱ्या संघटनेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे असून याबाबत पोलीस विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) या प्रकरणी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन यांना सदर आरोपाच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. याबाबत्त महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनने ऑनलाइन बैठक घेऊन अशा प्रकारच्या आरोपांचे खंडन करुन याबाबत कोणत्याही खेळाडूची तक्रार नसल्याचे कळविले आहे.

(४) सदर राष्ट्रीय स्पर्धाच्या खर्चासाठी दिलेल्या १२ कोटी ४५ लाख रूपयांचा निधीमध्ये अपहार केल्यावाबत महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर संघाचे कार्याध्यक्ष यांनी आरोप केले होते. तसेच समर्थ पोलिस ठाणे, पुणे येथे फिर्याद दिली होती त्याअनुषंगाने महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे तत्कालीन महासचिव यांचे विरुध्द समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.रं.नं.२४०/२०२५ भा.ना.सं. कलम ३१६(४), ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस विभागाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईसह महानगरातील अनेक विकासकांनी गृह प्रकल्पात २० टक्के**
**घरे राखीव ठेवण्याच्या निर्णयाचे उल्लघंन केल्याबाबत**

**(९) * २३५९६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गृहनिर्माण प्रकल्पात सर्वसमावेशक योजनेतंर्गत २० टक्के घरे राखीव ठेवण्याबाबत दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१३ रोजी शासन निर्णय जारी करण्यात येऊन देखील, मुंबईसह महानगरातील अनेक विकासकांनी गृह प्रकल्पातील २० टक्के राखीव घरे शासन तथा म्हाडाला हस्तांतरीत न करता परस्पर विक्री करुन कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणांची शासनाने गंभीर दखल घेऊन, मुंबईसह महानगरातील बांधकाम पुर्ण केलेल्या किती प्रकल्पातील विकासकांनी शासन निर्णय जारी झाल्याच्या दिनांकापासून ते अद्यापपर्यंत २० टक्के घरे म्हाडाला हस्तांतरीत न करता विक्री केल्याचे आढळून आले आहे व किती प्रकल्पात अद्यापपर्यंत म्हाडाला घरे हस्तांतरीत करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे,
(३) असल्यास, शासन निर्णयाचे उल्लंघन करुन बेकायदा घरे विक्री करणाऱ्या किती विकासकाविरुध्द शासनाने कारवाई केली आहे तसेच किती विकासकांची घरे जप्त करुन २० टक्के राखीव घरांचा कोटा पूर्ण केला आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०२० (UDCPR) मधील कलम ३.८.२ सर्वसमावेशक गृहनिर्माण (Inclusive Housing) मधील तरतूदीनुसार १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडावरील प्रस्तावांकरीता निव्वळ भूखंड क्षेत्राच्या किमान २०% बांधकाम क्षेत्र किंवा भूखंड किंवा सदनिका आर्थिक दृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट घटकांसाठी वितरीत करण्याची तरतूद आहे.

नाशिक जिल्ह्यात काही जमीन मालक/ विकासक यांनी जाणीवपूर्वक भूअभिन्यासाचे क्षेत्र विभाजीत करुन ४००० चौ.मी. पेक्षा कमी केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) नाशिकमध्ये भूखंडाच्या विभाजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली७ सदस्यीय समिती स्थापन केली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दि. ०७.१०.२०२५ च्या पत्रान्वये महसूल विभागास सादर केला आहे.

तसेच म्हाडा प्राधिकरणाने नाशिक मधील ६६ भूखंडाच्या विभाजनाच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस दिनांक ३१.१०.२०२५ रोजी कळविले आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणी महसूल व वन विभाग तसेच नाशिक महानगरपालिकेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना शहरात सिडको प्रकल्प, आयसीटी इमारत व रस्ते प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१०) * २३८१३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहरातील सिडको प्रकल्प, आयसीटी इमारत तसेच विविध रस्ते विकास प्रकल्पांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली असतानाही प्रत्यक्ष काम सुरू न होता हे प्रकल्प बऱ्याच काळापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत विलंब झाल्यामुळे औद्योगिक विकास, वाहतूक सुविधा, नागरिकांच्या दैनंदिन सोयी तसेच शहराच्या सर्वांगीण विकासावर प्रतिकूल परिणाम होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विभागांमधील समन्वयाचा अभाव, निधी वितरणातील विलंब, ठेकेदार व प्रशासकीय निर्णय प्रक्रियेतील दिरंगाई यामुळे हे प्रकल्प प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने हे प्रकल्प तातडीने सुरू करून वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) जालना शहर परिघस्त क्षेत्रातील मौजे खरपुडी येथे नवनगर प्रकल्प राबविण्यासाठी सिडको महामंडळाची "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली असून जमिनीच्या थेट खरेदीची कार्यवाही सुरु आहे. प्रकल्पातील २४७ हे. क्षेत्रापैकी २२६ हे. क्षेत्रासाठी संमती प्राप्त झाली असून १७८ हे. जमिनीची संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. अन्य क्षेत्राच्या भूसंपादनासंदर्भात जमिनीची संयुक्त मोजणी, दर निश्चिती व अनुषंगिक कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२३/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेचे मराठवाडा क्षेत्रातील उपकेंद्र जालना येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प प्रस्तावासाठी भांडवली खर्चापोटी लागणाऱ्या रु.२०२.९० कोटी इतक्या अपेक्षित खर्चापैकी राज्य शासनातर्फे रु.१००.०० कोटी इतका निधी टप्प्याटप्प्याने देण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित रु.१०२.९० कोटी इतका निधी संस्था स्तरावरुन उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेचे मराठवाडा उपकेंद्र, जालना येथील पायाभूत सुविधा व विविध इमारतीच्या बांधकामासाठी तयार करण्यात आलेले नकाशे व रु.५६९.३८ लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.१९/०९/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शासनामार्फत सन २०१९-२० मध्ये रु.१८.०० कोटी व सन २०२०-२१ मध्ये रु.२.०० कोटी, सन २०२२-२३ मध्ये रु.४.२५ कोटी, सन २०२३-२४ मध्ये रु.३.४९३० कोटी व सन २०२४-२५ मध्ये रु.६.९९३० कोटी असा एकुण रु.३४.७३६ कोटी इतका निधी शासनाद्वारे संस्थेस वितरीत केलेला आहे. सन २०२५-२६ करीता एकूण १० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असून निधी वितरणाच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

जालना महानगरपालिकेंतर्गत वेळोवेळी रस्ते विकास प्रकल्पांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झालेल्या असून सदर रस्त्याची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. याव्यतिरिक्त प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता प्राप्त कामे प्रलंबित नाहीत. तसेच, केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ अंतर्गत तांत्रिक मान्यता दिलेल्या मुख्य रस्त्यांची कामे पूर्ण झालेली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत.

सिडकोच्या खरपुडी प्रकल्पाच्या अनुषंगाने नागरिकांच्या दैनंदिन सोईच्यादृष्टीने कामे प्रलंबित नाहीत. तसेच मराठवाडा उपकेंद्राच्या मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले नसले तरी भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीत प्रशासकीय कामकाज पूर्ण क्षमतेने कार्यरत असून शैक्षणिक सोयी याठिकाणी उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेत सुरक्षा सेवांचे कंत्राट मिळविलेल्या कंपनीने बनावट हजेरी दाखवून केलेला गैरव्यवहार

**(११) * २५४४४ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्याकडून सुरक्षारक्षक पुरविण्याचे कंत्राट मिळविलेल्या खाजगी कंपनीने कोट्यवधी रुपयांचा शासकीय निधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजेरी पत्रकानुसार माहे जानेवारी, २०२४ मध्ये काही सुरक्षा रक्षक एम पूर्व व एम पश्चिम विभागांमध्ये एकाच दिवशी हजेरी पटावर असल्याचे दाखविण्यात आले असून दोन्ही ठिकाणचे देयक कंपनीने पालिकेकडून घेतले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षा दल विभागाकडे याबाबत तक्रार केली असता सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून याबाबतच्या अहवालात एम पूर्व व एम पश्चिम विभागाच्या सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांकडून संबंधित कंपनीला एकूण ५५८ दिवसांच्या म्हणजेच १९ महिने दहा दिवस उपस्थितीचे जास्तीचे अधिदान प्रदान झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या हजेरीवर १६ तास आणि त्याच दिवशी एम एम आर डी ए च्या हजेरीवरही कार्यरत असल्याचे दाखविले गेले असून त्यांनी २४ तास काम केल्याचा दावा करुन फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या संबंधित जबाबदार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व व एम/पश्चिम कार्यालय अतंर्गत मुख्य रुग्णालय, प्रसुतीगृहे, अग्निशमन केंद्र, स्मशानभुमी, दवाखाने, प्रकल्प बाधित इमारती व इतर महत्वाच्या ठिकाणी मे.ईगल सेक्युरिटी ॲन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस या खाजगी संस्थेचे सुरक्षा मदतनीस कार्यरत आहेत.

एम/पूर्व व एम/पश्चिम कार्यालय या दोन वेगवेगळया साईटवर पाच ते सहा एकाच नावाचे सुरक्षा रक्षक हजेरी पटावर दाखविण्यात आल्याची तक्रार दिनांक २२ मार्च, २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने

तपासणी केली असता, माहे जानेवारी, २०२४ मध्ये एम/पूर्व विभाग कार्यालयाकरीता ९ मदतनीस व एम/पश्चिम विभाग कार्यालयाकरीता ९ मदतनीस या प्रमाणे १८ मदतनीस यांनी दोन ठिकाणी एकाच वेळी उपस्थिती दर्शविल्याचे तसेच यापोटी रु.२,२९,७५८/- इतके अधिदान मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस यांना करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

याबाबत मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस यांचा खुलासा घेण्यात आला. तथापि, त्यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने त्यांना माहे जानेवारी, २०२४ मध्ये अधिदान करण्यात आलेले रु.२,२९,७५८/- आणि रु.२,७९,०००/- इतका दंड याप्रमाणे एकूण रु.५,०८,७५८/- इतकी रक्कम मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस यांच्या माहे जुलै, २०२५ च्या देयकामधून वसूल करण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

एम/पूर्व व एम/पश्चिम विभागाच्या सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांकडून संबंधित कंपनीला १८ मदतनीसांना ३१ दिवसांच्या उपस्थितीसाठी जादा अधिदान करण्यात आले आहे.

(४) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अखत्यारित असलेल्या एम/पुर्व विभागातील व्हिडीओकॉन अतिथी शेल्टर व आर.एन.ए. पार्क येथील प्रकल्पबाधित इमारतीच्या संरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या एकुण १८ सुरक्षा मदतनीसांच्या नावात साम्यता आढळून आल्याने एकुण १८ मदतनिसांची एकुण उपस्थिती पडताळून सदर १८ मदतनिसाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या अधिदानाची रु.३,४९,७८१/- इतकी रक्कम मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस या कंत्राटदाराकडून चलनाद्वारे वसुल करण्यात आली आहे.

(५) सदर प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने समिती गठीत केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस या संस्थेस वितरीत करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या सर्व साईटवरील माहे मे, २०२५ पासूनचे देयक अदा रोखून ठेवण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस यांना काळ्या यादीत का टाकण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. खुलासा समाधानकारक नसल्यास मे.ईगल सेक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस यांना काळ्या यादीत टाकण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

तसेच सदर प्रकरणी मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षा दलामार्फत प्राथमिक चौकशी पूर्ण झाली आहे. सदर चौकशीत दोषी आढळत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची विभागीय चौकशीची पुढील कारवाई महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात एका रुग्णाचा झालेला मृत्यू

**(१२) * २७६७६ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात दाखल झालेला एका हिमोफिलिया रुग्णाचा मेंदूतील रक्तस्त्रावा दरम्यान वेळेवर क्लॉटिंग फॅक्टरचे इंजेक्शन न मिळाल्याने मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत के.ई.एम. रुग्णालयाचे अधिकारी यांनी दिलेल्या माहिती नुसार इंजेक्शन खरेदीचा प्रस्ताव पालिका प्रशासनाकडे पाठविण्यात आला होता, मात्र तो मंजूर झाला नाही तसेच माहे डिसेंबर, २०२५ मध्ये केंद्र शासनाकडेही इंजेक्शन पुरवठ्याची मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषधांचा पुरवठा व आवश्यक साधन सामग्री तात्काळ उपलब्ध होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य मिशन (एन.एच.एम.) या केंद्र शासनाच्या योजनेतंर्गत धोरणात्मक बाब म्हणुन तृतीयक आरोग्य केंद्राला नोव्होसेवन इंजेक्शन उपलब्ध करुन देणे सन २०२४ पासून बंद केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे रा.ए.स्मारक (के.ई.एम.)

रुग्णालय हे तृतीयक आरोग्य केंद्र असल्यामुळे या औषधाचा पुरवठा प्राप्त झालेला नाही. तथापि रुग्णालय प्रशासनाद्वारे औषध साठा उपलब्ध होण्याकरीता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम शिक्षण कर्ज योजनेतंर्गत निधी मिळण्याबाबत

**(१३) * २३८३८ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाद्वारे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम शिक्षा कर्ज योजनेतंर्गत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना परदेशी व्यवसाय शिक्षण, तंत्र शिक्षण तसेच डिप्लोमा करण्याकरिता किमान ३० लाख रुपयांपर्यत कर्ज उपलब्ध करण्याची सोय आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमध्ये निधीचा अभाव असल्यामुळे या वर्षाच्या शैक्षणिक वर्षामध्ये पात्र विद्यार्थ्यांना निधी मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेतंर्गत किमान २३ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामध्ये तक्रार दिली असून त्यांच्या तक्रारीनुसार या विद्यार्थ्यांना कर्ज मंजूर झाले परंतू निधी नसल्याने या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
नॅशनल मायनॉरीटी डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (NMDFC), नवी दिल्ली यांच्याकडून जानेवारी, २०२६ मध्ये एकूण रू.१५.०० कोटी निधी विविध योजनेंसाठी उपलब्ध झाला असून यापैकी रू.३.०० कोटी इतका निधी शिक्षण कर्ज योजनेसाठी उपलब्ध झाला आहे.
(३) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे कर्ज योजनेअंतर्गत २३ विद्यार्थ्यांची तक्रार प्राप्त झालेली नाही.
नॅशनल मायनॉरीटी डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (NMDFC), नवी दिल्ली यांच्याकडून शिक्षण कर्ज योजनेसाठी जानेवारी, २०२६ मध्ये प्राप्त झालेला रू.३.०० कोटी इतका निधी मंजूर कर्ज प्रकरणांमध्ये कर्ज वितरणाची कार्यवाही मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळामार्फत चालू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जेजुरी (जि.पुणे) येथील खंडोबा देवस्थान परिसरात भेसळयुक्त भंडाऱ्यामुळे झालेला अपघात

**(१४) * २३५८२ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील जेजुरी नगर परिषदेच्या निवडणुकीच्या निकालानंतर विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थक कार्यकर्ते यांनी खंडोबा गडाच्या पहिल्या पायरीवर भंडारा अर्पण करून नतमस्तक होताना रविवार दिनांक २१ डिसेंबर,२०२५ रोजी उधळणी करण्यात आलेल्या भेसळ युक्त भंडाऱ्याचा मोठा भडका उडाल्याने नगरसेविकेसह १६ जण होरपळून जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जेजुरी येथील श्री.खंडोबा देवस्थान परिसरात भाविकांना वाटप करण्यात येणाऱ्या भंडाऱ्यात भेसळ, काळाबाजार व अनियमितता होत असल्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, अन्न व प्रशासन विभाग यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडाऱ्यातील भेसळयुक्त नमुन्यांची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत अवर सचिव, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना तात्काळ कारवाई व अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर विकल्या जाणाऱ्या ज्वालाग्राही व 'भेसळयुक्त भंडाऱ्यामुळे' ही आग लागल्याचा प्राथमिक संशय व्यक्त होत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भाविकांच्या आरोग्याशी खेळ होत आहे व यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेच्या नियोजनाचा अपव्यय होत असल्याची निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जेजुरी देवस्थान परिसरातील विक्री करण्यात येणारा भंडारा ताब्यात घेऊन त्याची अन्न व औषध प्रशासनाच्या लॅबमध्ये तपासणी करण्यात आली आहे काय, तसेच राज्यातील भंडाऱ्यामधील भेसळ करणाऱ्या कंपन्यांवर व विक्री करणाऱ्यां दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २२/१२/२०२५ रोजी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व सौंदर्य प्रसाधने त्याअंतर्गत नियम, २०२० या कायद्यानुसार नंदि चौक, जेजुरी येथील मे.श्रुष्टी प्रसाद भंडार या दुकानाची पोलिसांसमवेत तपासणी/चौकशी केली असता सदर दुकानामध्ये विनालेबलच्या एकुण १५ बॅगेमध्ये प्रत्येकी ५ किलो याप्रमाणे पिवळा रंगाचा भंडारा निर्देशनास आला. सदर साठा पुढील कारवाईसाठी पोलिस ठाणे, जेजूरी येथे पोलिसांमार्फत नेण्यात आला. सदर बॅगेतून १ नमुना चाचणी साठी पोलिसांसमक्ष घेण्यात आला व उर्वरीत साठा संबधीत पोलिस ठाणे येथे जमा करण्यात आला असून सदर साठा जतन करून ठेवण्याबाबत संबधीत पोलिस ठाणे यांना कळविण्यात आले आहे. सदर साठ्यातील नमुना चाचणीकरीता औषध नियंत्रण प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आला होता. सदर नमुन्यांचा अहवाल दि.२०.०२.२०२६ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार भंडाऱ्यामध्ये ज्वालाग्रही पदार्थाची भेसळ जसे Phosphorus, Camphor असल्याचे आढळून आले नाही. तसेच, त्याव्यतिरिक्त शरीरास हानीकारक Heavy Metals, Lead, Arsenic, इत्यादी घटक नेमून दिलेल्या IS परिमानानुसार असल्याचे आढळून आले असून सदर नमुन्यात Metallic Yellow Color आढळून आले नाही.

या घटनेपूर्वी अन्न व औषध प्रशासनाने दि.२९/०३/२०२५ रोजी जेजुरी येथील भंडारा विक्रेत्याकडून भंडाऱ्याचा नमुना चाचणीसाठी घेण्यात आला होता. सदर नमुन्यांच्या प्राप्त विश्लेषण अहवालनुसार सदर नमुने परिमानानुसार असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे अद्यापावेतो भंडाऱ्यामध्ये घातक रसायन रंगाची भेसळ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच, भंडाऱ्यातील साहित्यामुळे भाविकांना त्वचेचे विकार व डोळयांच्या समस्या उद्‌भवत असल्याचे निदर्शनास आले नाही.

तसेच, अन्न व औषध प्रशासनाने दिनांक-२२/१२/२०२५ रोजी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नियम व नियमन, २०११ नुसार घटना घडलेल्या ठिकाणी तपासणी करून हळद पावडर वाहतूक करणारे वाहन क्र.एम एच ०७ ए जे ५८२९ टाटा इंट्रा व्ही ३० या कंपनीचे वाहनातून प्रत्येकी १० कि. वजनाच्या कंपनी packed, sealed & labelled असे २२० bags चा हळदीचा साठा आढळून आला. त्यानुसार, हळद या अन्नपदार्थाचा नमुना अन्न सुरक्षा मानके कायद्यानुसार विश्लेषण करण्याकरिता घेऊन उर्वरित साठा २२० बॅग (२१९८ किलो) किंमत रु.२,६३,७६०/- लेबलदोष, कमी दर्जाचा व भेसळयुक्त असल्याच्या संशयावरून जप्त करून जेजुरी पोलीस स्टेशन ठेवण्यात आला आहे. सदर अन्न नमुन्याचा एक नमुना भाग राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आला आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये Turmeric Structure and unidentified Foreign Starch व Pesticide Residue ०.१९० mg/kg आढळून आल्यामुळे अन्न विश्लेषक यांनी त्यांच्या दि. ३१/१२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार असुरक्षित घोषित केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेद्वारे सुरु करण्यात येणारे महिला सुरक्षा ॲप अद्याप कार्यान्वित झाले नसल्याबाबत

**(१५) * २५८८१ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महिलांच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिकेच्या वतीने मोबाईलद्वारे महिला सुरक्षा ॲप विकसित करण्यात येणार असून पालिकेने सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पात १०० कोटीं रुपयांची तरतूद करण्याची घोषणा तत्कालीन आयुक्तांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत महिला आणि तरुणींवर होणारे अत्याचार, हल्ले व छेडछाडीच्या घटनांमुळे राज्य सरकारने पालिकेला महिला सुरक्षा मोबाईल ॲप विकसित करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असतांनाही आजमितीपर्यंत महानगरपालिकेच्या आयटी विभागाने सदर ॲप विकसित केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महिलांच्या सुरक्षेसाठी ॲप विकसित करण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) "महिला सुरक्षा ॲप्स" विकसित करण्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व संबंधित महिला सुरक्षा सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी यांच्या सोबत संयुक्त चर्चेअंती सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात महिला सुरक्षा ॲप्स विकसीत करण्याची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील पवई येथील जयभीम मधील मागासवर्गीयांची घरे निष्कासित केल्याबाबत**

**(१६) * २७२१५ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पवई येथील जयभीम नगर मध्ये गेली अनेक वर्षापासून राहत असलेल्या अंदाजे ६५० मागासवर्गीयांची घरे भरपावसात तोडून तेथील रहिवाश्यांना बेघर केल्याचे दिनांक ६ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यात कोणत्याही प्रकारची निष्कासनाची कारवाई न करण्याचे शासनाचे निर्णय व नियम असतानाही त्याचे उल्लंघन करुन स्थानिक महानगरपालिका अधिकारी आणि विकासक याच्या संगनमताने सदर कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर एसआयटीमार्फत चौकशी व गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करण्यात यावी, असे मा.मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देवूनही संबंधितांवर कोणतीही कारवाई अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेघर कुटुंबियांचे तात्काळ पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच विकासक व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पवई गाव येथील सि.टी.एस. क्र.६ A,६ A/१ व तीरंदाज गाव येथील सि.टी.ए.एस.क्र.२० व २२ यावर तात्पुरत्या स्वरुपात कामगारांच्या झोपड्या बांधण्याकरीता महानगरपालिकेने अटी व शर्तीसह दि.२८ फेब्रुवारी, २०१३ पर्यंत परवानगी देण्यात आली होती. याकालावधीनंतर झोपड्या न हटवल्याने नोटीस देण्यात आली तथापि पोलिस कर्मचारी उपलब्ध न झाल्याने निष्कासनाची कारवाई करता आली नाही. सदर निष्कासनाच्या कारवाईस टाळाटाळ केल्याने दि.२८ डिसेंबर, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगामध्ये महानगरपालिकेविरुद्ध दावा दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. सदर आदेशानुसार महानगरपालिके मार्फत दि.०६ जून, २०२४ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(२) मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने दिलेल्या आदेशानुसार कारवाई करणे आवश्यक असल्याने निष्कासनाकरीता आवश्यक पोलिसांची उपलब्धता झाल्यानंतर विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून सदर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) व (४) सदर झोपडपट्टी निष्कासन कारवाईच्या अनुषंगाने दाखल झालेल्या क्रिमीनल रिट पिटीशन क्र.१२५५८ /२०२४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०९ ऑगस्ट, २०२४ रोजी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून यामध्ये ०२ दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच पुढील तपास विशेष तपास पथकामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील नायगाव उड्डाणपुलाच्या संरक्षक कठड्यांची उंची अपुरी असल्याबाबत

**(१७) * २४२६० श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील एम.एम.आर.डी.ए.ने बांधलेल्या नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलावरील संरक्षक कठड्यांच्या अपुऱ्या उंचीमुळे भरधाव वेगाने जाणारी वाहने थेट खाली कोसळून अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायगाव वरून उमेळाफाटा येथे भरधाव वेगाने जात असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पुलावरून दुचाकीसह थेट खाली कोसळल्यामुळे श्री.तुषार जोगळे या तरूणाचा दिनांक ६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाचे सदोष आराखडे आणि बांधकामाची शासनाकडून चौकशी करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात अपघाताच्या दुर्घटना रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नायगाव उड्डाणपुलाचे काम हे एम.एम.आर.डी.ए. मार्फत IRC Code प्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे.

(४) सदर पुलावरून सुरक्षित रहदारीच्या दृष्टीने खालील प्रमाणे सुरक्षात्मक उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत :-

- वाहने नियंत्रित वेगाने चालविण्यासाठी ठराविक अंतरावर वेगमर्यादेचे फलक बसविले आहेत.
- पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे.
- पुलावर वळण घेण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी दिशा दर्शक फलक बसविण्यात आले आहेत.
- नॅरो रोड, वेगमर्यादा, वळण, नो ओव्हरटेक असे विविध सूचना देणारे फलक असताना देखील भरधाव वेगाने वाहन चालक पुलाचा वापर करीत आहेत. त्यामुळे सदर वळणाच्या ठिकाणी क्रॅश बॅरीअर बसविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## राज्यातील रेशन दुकानातून धान्य चोरी करून काळ्या बाजारात विक्री होत असल्याबाबत

**(१८) * २८५८५ श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वस्त धान्य विक्री दुकानातून लाभार्थ्यांना ऑनलाइन फिंगर प्रिंट आणि मोबाईल ओटीपी प्राप्त करून धान्य वितरण केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा, पिंपरी चिंचवड व पुणे शहरात मागील काही महिन्यापासून ऑनलाईन प्रणालीद्वारे ९७ ते ९८ टक्के लाभार्थ्यांना धान्य वितरण केले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांच्या बोगस फिंगरप्रिंट, मोबाईल ओटीपीचा उपयोग करून रेशन दुकानदार, अन्नधान्य वितरण अधिकारी व गोदाम कर्मचारी यांच्या संगनमताने लाभार्थ्यांच्या नावावर धान्य उचलल्याचे दाखवून मोठ्या प्रमाणावर काळ्या बाजारात धान्य विकले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने पुणे अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या वतीने ऑनलाइन धान्य चोरीची चौकशी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पनवेल तालुक्यात एकूण लाभार्थींची संख्या काय आहे तसेच सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व सन २०२५-२६ या कालावधीमध्ये किती धान्य पुरवठा करण्यात आला होता व किती लाभार्थ्यांना धान्य पुरवठा वितरीत करण्यात आला असून किती लाभार्थ्यांना धान्य पुरवठा कमी देण्यांत आला असून पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील अन्न धान्य पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या मनमानी व नियोजनशुन्य कारभारामुळे गोरगरीब लाभार्थ्यांना मासिक धान्य कोटा कमी मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे शहरात व परिसरातून दर मासिक सहा हजार टन धान्य चोरी करून काळ्या बाजारात विकले जात असल्याबाबत अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी चौकशी करून सविस्तर अहवाल राज्य शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर धान्य चोरी करणारे, दोषी अधिकारी/कर्मचारी व रेशन दुकानदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि.११/०७/२०२३ च्या पत्रान्वये आधार प्रमाणीकरण करण्याकरिता विविध पद्धतींचा अवलंब करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यामध्ये फिंगर प्रिंट आणि मोबाईल ओटीपी चा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील रास्तभाव दुकानामधून लाभार्थ्यांना ऑनलाइन फिंगर प्रिंट किंवा मोबाईल ओटीपी किंवा आयरीस स्कॅनरद्वारे पडताळणी करुन धान्य वितरण केले जाते.

(२) पिंपरी-चिंचवड व पुणे शहरामध्ये माहे डिसेंबर, २०२५ मध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे सरासरी ९४% व पुणे ग्रामीण मध्ये डिसेंबर, २०२५ मध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे सरासरी ९४% अन्नधान्य वितरण झालेले आहे.

(३) सदर प्रकरणी अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने NIC प्रमुख यांचेकडून तांत्रिक बाबींचा चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

पनवेल तालुक्यात एकूण २,८३,५३० लाभार्थी आहेत. पनवेल तालुक्यात सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व सन २०२५-२६ कालावधीमध्ये करण्यात आलेल्या धान्य पुरवठ्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | मंजूर नियतन (क्वि.) | ऑनलाईन वाटप (क्वि.) |
|---|---|---|
| २०२२-२३ (माहे ऑगस्ट, २०२२ ते मार्च, २०२३) | २,३०,४४५ | १,१०,३४८ |
| २०२३-२४ | १,६६,१८९ | १,५९,७६४ |
| २०२४-२५ | १,६८,८१८ | १,६१,८९० |
| २०२५-२६ | १,७२,९४२ | १,४७,१५१ |
| नोव्हेंबर, २०२५ | १४,७६४ | १४,१३९ |
| डिसेंबर, २०२५ | १४,२५३ | १३,९७५ |
| जानेवारी, २०२६ | १३,५४४ | १३,५८३ |

नियतन मंजूर करताना गहू आणि तांदळाचे बदलते प्रमाण, दुकानदारांची लेखी मागणीपत्रक, पोर्टेबिलीटी, दुकानातील धान्याची शिल्लक, दुकानातील ऑनलाईन सेल, दुकानदारांची मागील महिन्यातील शिल्लक वजा करुन पुढील महिन्याचे आवश्यक नियतन मंजूर करणे या सर्व बाबी विचारात घेऊन दुकानाचे नियतन निश्चित केले जाते.

(५) हे अंशत: खरे आहे.

क्षेत्रिय कार्यालयास्तरावरुन तांत्रिक पडताळणी करणे शक्य नसल्याने, तसेच लाभार्थ्यांच्या बोगस फिंगरप्रिंट चा उपयोग ऑनलाईन धान्य चोरीकरिता केल्याची बाब तांत्रिक स्वरुपाची असल्याने सदर प्रकरणी NIC प्रमुख यांचेकडून तांत्रिक बाबींचा चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात अंत्योदय आणि प्राधान्य लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा होत असल्याबाबत

**(१९) * २४८६६ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.रमेश कराड (लातूर गामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य आणि केंद्र शासन गरजू लोकांना अंत्योदय आणि प्राधान्य लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी पाच किलो गहू आणि तांदूळ मोफत देत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न नागरी पुरवठा खाते नियंत्रण आणि वितरण व्यवस्था पाहत असून गेल्या काही महिन्यांमध्ये या योजनेतील लाभार्थ्यांना किडलेले गहू तांदूळ आणि खराब ज्वारीचे वाटप होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धान्य कोंबड्या व बकऱ्यांनाही देता येणार नाही असे धान्य असून ते गरजू लोकांना देण्यात येत आहे. या भेसळयुक्त धान्याला दुर्गंधी येत असून त्यामध्ये सोनकिडे ही असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची जबाबदारी अन्न नागरी पुरवठा विभागाची असतानाही जिल्हास्तरावर पुरवठा अधिकारी, तालुका स्तरावर पुरवठा निरीक्षक, गोडवान किपर यांच्या नियुक्त्या असतानाही भेसळयुक्त धान्याच्या सर्रास पुरवठा होताना दिसत असून याबाबत स्वस्त धान्य दुकानदारांना विचारणा केली असता जसे धान्य शासनाकडून येते तसेच वितरित करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवठा होऊ नये म्हणून संबंधितांवर तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत राज्यातील पात्र अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना प्रति माह ३५ किलो अन्नधान्य प्रति शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब योजनेच्या लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी ५ किलो अन्नधान्य प्रतिमाह मोफत वितरित करण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही. अन्न, नागरी पुरवठा, व ग्राहक संरक्षण विभाग नियंत्रण व वितरण व्यवस्था पाहत असून गेल्या काही महिन्यांमध्ये या योजनेतील लाभार्थ्यांना किडलेले गहू, तांदुळ आणि खराब ज्वारीचे वाटप होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, केवळ श्रीगोंदा तालुका, जिल्हा अहिल्यानगर येथे ज्वारीच्या व तांदळाच्या काही गोण्यांना जाळी लागल्याचे निदर्शनास आल्याने सदर खाण्यायोग्य नसलेले धान्य तालुका शासकीय गोदामात उतरवून न घेता परत पाठविण्यात आले आहे. तसेच कोणताही पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित राहू नये याकरीता स्वच्छ केलेले धान्य वितरित करण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या अन्नधान्याची गुणवत्ता सुनिश्चित करुनच अन्नधान्याचे वितरण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील शितल व दर्शना या शासकीय अधिकारी निवासस्थानांची झालेली दुरवस्था

**(२०) * २५७०२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळीतील शासकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थान परिसरातील सुरक्षा व्यवस्था व घाणीचे साम्राज्य यामुळे अधिकारी यांना वारंवार डासांचा त्रास होत असून काही वेळा साप निघत असल्यामुळे बाहेर खेळत असलेली लहान मुले यांना धोका निर्माण झाला असून, पार्कींगमध्ये लाईटची सुविधा नसल्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांना त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने याबाबत वारंवार तक्रारी तसेच दूरध्वनी करुनही सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी यांनी बेजबाबदारपणाची उत्तरे दिली असून अनेकवेळा दूरध्वनी ही घेत नाहीत या सगळयामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी येथील स्नेहा बी या इमारती मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे पिझ्झा बॉयने घरी कोणी नसताना एका मुलीला त्रास देऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अद्यापपर्यंत वरळी येथील स्नेहा इमारतीमधील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असून शितल, दर्शना या इमारतीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे अद्यापपर्यंत लावण्यात आलेले नसून याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सीसीटीव्ही नसल्याने निर्माण झालेला सुरक्षा व्यवस्थेचा धोका, लिफ्टची झालेली दुरवस्था, घाणीचे साम्राज्य, निवासस्थान खिडक्यांची दुरवस्था, पार्कींगमध्ये असलेली अस्वच्छता याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही

(२) व (३) स्नेहा या इमारतीतील घटनेबाबत रहिवाशी व सुरक्षारक्षक यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार सदर घटना साधारणपणे १० ते १२ वर्षापूर्वी घडल्याचे कळले आहे. त्यानंतर अशा स्वरुपाची कोणतेही घटना घडलेली नाही. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याच्या अनुषंगाने विद्युत सा.बां. विभागामार्फत सर्व्हे करुन आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल.

(४) दर्शना व शितल या इमारतीमधील दोन्ही उद्वाहने सुस्थितीत चालू असून त्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती ही करण्यात येत आहे. तसेच शितल व दर्शना इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीचे व नुतनीकरणाचे कामे सन २०२२-२०२३ मध्ये पूर्ण करण्यात आलेले असून प्रत्येक सदनिकांची खिडक्यांची दुरुस्ती करणे, फरश्या बदलणे , जाळी बसविणे, किचन ओटा दुरुस्ती करणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आलेली असून सद्यःस्थितीत सुस्थितीत आहेत.

स्नेहा इमारतीमध्ये एकूण ३८ सदनिका असून त्यापैकी १९ सदनिकांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहे व उर्वरीत दुरुस्तीची कामे सद्यःस्थितीत प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**गडचिरोली जिल्हयात धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांकडून**
**देणगी स्वरुपात रक्कम घेत असल्याबाबत**

**(२१) * २९४८२ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत सन २०२५-२६ च्या हंगामासाठी वडसा, आरमोरी, गडचिरोली, चामोर्शी, मुलचेरा या तालुक्यात धान खरेदी केंद्रांद्वारे खरेदी सुरु करण्यात आली, मात्र केंद्रांवर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान खरेदीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करताना कोणतेही शुल्क आकारले जाऊ नये असे शासनाचे आदेश असतानाही धान खरेदी संस्थांनी पावती बुक छापून १०० ते २०० रुपये नोंदणीसाठी वसुल केले जात आहे, तसेच ४० किलोच्या एका पोत्यासाठी हमाली १५ रुपये घेतली जात असून एका क्विंटलमागे शेतकऱ्यांकडून ३७ रुपये वसुली केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासानाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन झाले व त्यानूसार धान खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान तातडीने थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) किमान आधारभूत खरेदी योजनेअंतर्गत धान खरेदी करीता खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करुन, प्रत्यक्ष धान खरेदी करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत संबधित शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची रक्कम कोणत्याही कारणास्तव आकारण्यात येत नाही.

तथापि, गडचिरोली जिल्ह्यामध्ये खरेदी संस्थेकडून ऑनलाईन नोंदणी करताना देणगीच्या स्वरुपात रक्कम घेऊन पावती दिल्याची बाब निर्दशनास आली आहे. अभिकर्ता संस्थेकडून याबाबत सखोल चौकशी करुन कारवाई करण्यात येत आहे.

(३) व (४) दि.१० फेब्रुवारी, २०२६ रोजी शासनाकडे प्राप्त तक्रारीनुसार दि.१३ फेब्रुवारी, १७ फेब्रुवारी व २० फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रानुसार याप्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश शासन स्तरावरुन अभिकर्ता संस्थांना दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्ह्यातील नवनियुक्त अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्याबाबत**

**(२२) * २४९२० श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन कार्यालयात गेल्या चार महिन्यांपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पाच अन्न सुरक्षा अधिकारी नियुक्त झाले असून, त्यांचे प्रशिक्षण पूर्ण होऊनही केवळ अधिकृत अधिसूचना (नोटिफिकेशन) न निघाल्यामुळे त्यांना प्रत्यक्षात कारवाईचे अधिकार मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकृत अधिसूचना नसल्याने या अधिकाऱ्यांना अन्न पदार्थांची तपासणी करणे, नमुने घेणे किंवा जप्ती करणे यांसारखी महत्त्वाची कायदेशीर कामे करता येत नसल्यामुळे जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांचा अवाढव्य कामाचा भार केवळ तीनच अधिकाऱ्यांवर पडत असून, यामुळे अन्न सुरक्षा नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळे येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील एकूण १९४ सुरक्षा अधिकाऱ्यांचे नोटिफिकेशन प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रलंबित असून, प्रशिक्षणाचे अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे उशिरा पोहोचल्यामुळे शासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे व या संपूर्ण प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अशा प्रकारच्या प्रशासकीय अधिसूचना विनाविलंब काढण्यासाठी शासन विशेष धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे अधिकार देण्यासाठी आवश्यक अधिसूचना प्रसिद्ध करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३), (४) व (५) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दि.०६/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये १८९ तसेच, दिनांक ०७/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये ०२ अशा एकूण १९१ अन्न सुरक्षा अधिकारी यांची अन्न व औषध प्रशासनात नियुक्ती करण्यात आली. त्यापैकी १९० अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासनात रुजू झाले आहेत.

सदर अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांपैकी १८५ अन्न सुरक्षा अधिकारी यांचे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमने २०११ मधील तरतूदीनुसार आवश्यक पायाभूत प्रशिक्षण माहे, डिसेंबर २०२५ मध्ये पूर्ण झाल्यानंतर त्यांचे प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतची प्रमाणपत्रे अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाकडून अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाली.

"अन्न सुरक्षा आयुक्त" या पदाची अधिसूचना दि.०५/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्यानंतर "अन्न सुरक्षा आयुक्त" यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ३७(१) अन्वये १८५ अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना दिनांक १०.०२.२०२६ रोजी अधिसूचित केले आहे.

जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यात मिळून अन्न सुरक्षा अधिकारी यांची १६ पदे मंजूर असून १५ पदे भरलेली आहेत. अन्न सुरक्षा अधिकारी यांना अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतूदीनुसार दि.१०/०२/२०२६ रोजी अधिसूचित केल्यामुळे अन्न व औषध प्रशासनाचे कामकाज सुरळीतपणे सुरु झाले आहे.

-----------------

## नागपूर येथील कवीवर्य सुरेश भट सभागृहाच्या देखभाल व संचालनासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(२३) * २३६६४ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेद्वारे कवीवर्य सुरेश भट सभागृहाच्या देखभाल व संचालनासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री तसेच आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम विशिष्ट एजन्सीला मिळण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न केल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, सदरहू निविदा प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या नागपूर महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच निविदा प्रक्रिया रद्द करुन नवीन राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही,

कवीवर्य सुरेश भट सभागृहाचे देखभाल व संचालनाकरीता कंत्राटदाराची नियुक्ती करणेकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारे निविदा प्रक्रिया विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन राबविण्यात आली आहे. सदर प्रक्रियेमध्ये विशिष्ट एजन्सीला काम देण्याबाबत अधिकाऱ्यांकडून प्रयत्न केल्याचे किंवा अनियमितता झाल्याचे महानगरपालिकेस आढळून आले नाही.

-----------------

## मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात सिटी स्कॅन आणि एमआरआय मशिनची नव्याने खरेदी करण्याबाबत

**(२४) * २८६८२ श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. (KEM) रुग्णालयात सिटी स्कॅन आणि एमआरआय (MRI) चाचण्यांसाठी रुग्णांना सध्या ३ ते ४ महिन्यांपर्यंतची तारीख दिली जात असल्याची बाब माहे जानेवारी २०२६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दररोज सुमारे ६ हजार रुग्ण उपचारासाठी येत असताना रुग्णालयात एमआरआयची केवळ एकच मशीन उपलब्ध असल्यामुळे यंत्रणेवर प्रचंड ताण येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना संगणकीकृत प्रक्रिया असूनही केसपेपर आणि नोंदणीसाठी पहाटे ६ वाजल्यापासून रांगेत उभे राहावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत असलेली एमआरआय मशिन जुनी असल्याने रुग्णांना बाहेरुन खाजगी रुग्णालयात चाचण्या कराव्या लागत असल्याने गरिब रुग्णांना नाहक आर्थिक भुर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच नवीन मशीन्स खरेदी करण्याची प्रक्रिया सध्या कोणत्या टप्प्यावर प्रलंबित आहे व महानगरपालिकेच्या रुग्णालयात खाजगी रुग्णालयांप्रमाणे अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राजा एडवर्ड स्मारक रूग्णालयात (KEM) दोन सिटी स्कॅन मशीन २४ x ७ सुरु असून अत्यावश्यक रुग्णांचे सी.टी. स्कॅन त्याच दिवशी केले जाते व आंतररुग्णांचे सी.टी. स्कॅन १ ते २ दिवसांत केले जाते. बाह्य रुग्णांना सी.टी. स्कॅनसाठी एक महिन्याची प्रतिक्षा यादी आहे.

राजा एडवर्ड स्मारक रूग्णालयात (KEM) एक एमआरआय (MRI) मशीन २४ x ६ सुरु असून अत्यावश्यक रुग्णांचे एमआरआय (MRI) त्याच दिवशी केले जाते व आंतररुग्णांसाठी एमआरआय १-२ दिवसांत केले जातात.

बाह्यरुग्णांचे एमआरआय शक्य तेवढे राजा एडवर्ड स्मारक रूग्णालयात (KEM) केले जातात. उर्वरीत रुग्णांना EOI (Expression of Interest) अंतर्गत असलेल्या ४ केंद्रामध्ये पाठविण्यात येते. सदर ४ ही केंद्रांमध्ये राजा एडवर्ड स्मारक रूग्णालयाच्या (KEM) निश्चित दराने एमआरआय केले जातात.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राजा एडवर्ड स्मारक रुग्णालयातील (KEM) बाहय रुग्ण नोंदणी विभाग येथे रुग्णांना संगणकीकृत / HMIS प्रणाली अतंर्गत नोंदणी कागदपत्र देण्याकरिता १५ खिडक्या व अतिरीक्त ४ खिडक्या (कंटेनर येथे) अशा एकूण १९ खिडक्या केवळ रुग्णांची नोंदणी करण्याकरीता दोन्ही पाळयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच गंभीर आजारी व आपत्कालिन रुग्णांसाठी कॅज्युअल्टी अंतर्गत नोंदणी २४ x ७ x ३६५ करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

रुग्णांची प्रचंड संख्या लक्षात घेता, आवश्यकतेप्रमाणे EOI (Expression of Interest) अंतर्गत राजा एडवर्ड स्मारक रुग्णालयातील (KEM) रुग्णांकरीता ४ केंद्र निवडले असून या केंद्रामध्ये राजा एडवर्ड रुग्णालयाच्या (KEM) दरात एमआरआय करून देण्यात येत आहेत.

(५) राजा एडवर्ड रुग्णालयामध्ये (KEM) नवीन एमआरआय मशिन खरेदीची प्रक्रिया चालू आहे, मार्चच्या पहिल्या आठवडयात TURNKEY चे काम सुरु होऊन, पुढील तीन ते चार महिन्यात मशिन स्थापित करण्यात येत आहे.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेने नोंदणी प्रमाणपत्र न घेताच**
**कंत्राटदारामार्फत कामगार नियुक्त केल्याबद्दल**

**(२५) * २८७२६ श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कंत्राटी कामगार नियुक्त करता येत नसतांना देखील बृहन्मुंबई महानगरपालिकेने कंत्राटदारामार्फत कंत्राटी कामगार नियुक्त केल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक वर्षांपासून बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध कामे सर्रास कंत्राटदार नियुक्त करून त्यांच्यामार्फत करून घेतली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने नोंदणी प्रमाणपत्र न घेताच कंत्राटदारामार्फत कंत्राटी कामगार नियुक्त केल्याची बाब कामगार विभागाने वेळोवेळी निदर्शनास आणून देखील अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधिताविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

महानगरपालिकेतील काही खाते/विभाग प्रमुख यांनी ‘कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७०’ अंतर्गत प्रमाणपत्र/अनुज्ञप्ती (Registration Certificate) प्राप्त करून घेतले आहे. ज्या खाते प्रमुखांनी नोंदणी प्रमाणपत्र घेतले नाही अशा बाबतीत नोंदणी प्रमाणपत्र घेण्याबाबत कार्यवाही चालु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत बहुतांश कामे नियमित कामगार/कर्मचाऱ्यांकडून करून घेण्यात येतात. अपरिहार्य परिस्थितीत काही कामे कंत्राटदारामार्फत नियुक्त कामगाराकडून करून घेण्यात येतात.

(३) होय, हे खरे आहे.

सदर बाबत महानगरपालिका प्रशासनाकडून परिपत्रक निर्गमित करून संबंधित खाते विभाग प्रमुख यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील रस्ते कॉँक्रिटीकरण आणि यूटिलिटी कॉरिडॉर प्रकल्पात**
**व्यवस्थात्मक त्रुटी आढळून आल्याबाबत**

**(२६) * २७९९९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मुंबई शहर खड्डेमुक्त करण्याच्या उद्देशाने सन २०२२ ते २०२५ दरम्यान रस्ते कॉँक्रिटीकरण आणि यूटिलिटी कॉरिडॉर प्रकल्प राबविण्यात आला असल्याचे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात अनेक व्यवस्थात्मक त्रुटी आढळल्या असून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे सदर प्रकल्पासाठी ४०० किमीच्या रस्त्यासाठी रुपये ५,८०० कोटींच्या मूळ निविदा काढण्यात आल्या असताना सदर निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळाल्याने मुळ प्रकल्प खर्चात १०७% वाढ करून ७०१ किमी रस्त्यासाठी १२००० कोटींच्या निविदा नव्याने राबविण्यात आल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प खर्चात १०७% वाढ करण्यामागची कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकल्पातील व्यवस्थात्मक त्रुटी दूर करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मुंबई शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्याच्या उद्देशाने २०२२ ते २०२५ दरम्यान टप्पा १ व टप्पा २ अंतर्गत ६९७.५३६ कि.मी. इतक्या लांबीच्या रस्त्यांचे कॉँक्रिटीकरण हाती घेण्यात आले आहे. हे रस्ते भविष्यात वारंवार खोदले जावू नये याकरिता यूटिलिटी डक्ट टाकण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाची टप्पा १ साठी निविदा प्रक्रिया सन २०२२ मध्ये सुरु करण्यात आली होती. या ५ निविदांची अंदाजपत्रके दरसूची २०१८ नुसार बनविण्यात आली होती. टप्पा-१ साठी रुपये ५१८३ कोटी किंमत अंदाजित करण्यात आली होती. या ५ निविदांसाठी प्रतिसाद प्राप्त झाला नाही. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेऊन रद्द करण्यात आली.

महानगरपालिकेद्वारे सुधारीत दरसूची २०२३ अंतीम करण्यात आली. यानुसार अंदाजपत्रके तयार करून निविदा प्रक्रिया पूर्ण करून रुपये ६६३२ कोटी इतक्या रकमेचे टप्पा-१ मध्ये (एकूण रस्ते ६९८ व लांबी ३१९.७७ कि.मी.) या रस्त्यांच्या कामासाठी कार्यादेश देण्यात आले. सन २०१८ व २०२३ मधील दरसुचीतील फरकामुळे तुलना केल्यास निविदांची किंमत वाढलेली दिसून येते.

टप्पा-२ मध्ये एकूण १४२० रस्त्यांच्या ३७७.७६ किमी लांबीच्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामासाठी रूपये १०४८१ कोटी इतक्या रकमेच्या निविदा मागविण्यात आल्या. व त्यानंतर माहे ऑगस्ट २०२४ मध्ये कार्यादेश देण्यात आलेले होते.

अशाप्रकारे टप्पा १ व २ मधील एकूण २११८ रस्त्यांच्या एकूण ६९७.५३६ कि.मी. इतक्या लांबीच्या काँक्रिटीकरणाच्या कामासाठी रूपये १७११३ कोटी इतक्या रकमेचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

(४) सिमेंट व लोखंड यांच्या भावात झालेली लक्षणीय वाढ, महानगरपालिकेची दरसूची २०१८ चे सुधारीकरण व त्यावर वस्तू व सेवा कर लागू झाला ही दरवाढी मागील कारणे आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जुहू येथील स्टर्लिंग को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नियुक्त असताना बेकादेशीररित्या सदस्य पद दिल्याबाबत

**(२७) * २५९५५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सातांक्रुझ (प.) जुहू, गुलमोहर क्रॉस रोड, जेव्हीपीडीएस मधील सीएस क्र.१२७ मधील स्टर्लिंग को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्थेवर सन २०२३ च्या कालावधीत प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालिन उपनिबंधक, सहकार विभाग, म्हाडा यांनी पदाचा दुरुपयोग करुन परस्पर सहकार अधिनियम कलम १५४-ब व ९ चे उल्लंघन करुन याआधी अर्ज नामंजूर केलेल्या प्रशासकाच्या अपरोक्षपणे श्री.हिरेन्द्र गांधी या त्रयस्थ व्यक्तीची दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ रोजी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्य पदावर बेकायदेशीररित्या नियुक्ती केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,संस्थेची कार्यकारिणी समिती अस्तित्वात नसताना प्रशासकाने श्री.हिरेन्द्र गांधी यांचा अर्ज नामंजूर केलेला असताना देखील उपनिबंधकांनी कोणत्या कायद्याच्या व निकषाच्या आधारे संस्थेच्या अपरोक्षपणे श्री.हिरेन्द्र गांधी यांना संस्थेचे सदस्यत्व पद दिले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संभाजी ब्रिगेडच्या अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व सहकार मंत्री यांना लेखी निवेदनानुसार उपाध्यक्ष तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा गृहनिर्माण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार म्हाडाने दिनांक ०३ जून, २०२५ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालाच्या निष्कर्षानुसार श्री.हिरेन्द्र गांधी यांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) व (३) श्री.हिरेन्द्र गांधी यांनी प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सदनिका क्र.४०१ हस्तांतरीत करण्यासाठी सभासद अर्ज दाखल केला. तथापि प्राधिकृत अधिकारी यांना धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नसल्याने, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात आला. त्यावर श्री.हिरेन्द्र गांधी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २३(२) अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांचेकडे अपिल दाखल केले असता, श्री.हिरेन्द्र गांधी यांनी दिनांक १०/०३/२००८ रोजीचे नोंदणीकृत खरेदीकराराद्वारे, त्यावरील मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा भरणा करुन, सदर सदनिका खरेदी केल्याचे दिसून आल्याने, उपनिबंधक, म्हाडा यांनी त्यांचे अपिल मान्य करुन, दि.०४.०९.२०२३ अन्वये, श्री.हिरेन्द्र गांधी यांना विहित शुल्क व कागदपत्रांसह संस्थेकडे सभासद अर्ज सादर करण्याबाबत आदेशित केले आहे.

(४) अध्यक्ष, संभाजी बिग्रेड यांनी दिनांक ०३/०६/२०२५ च्या पत्रान्वये सभासदांचे हस्तांतरणाकरीता मिळकतीचे अभिहस्तांतरण झाले असल्यास ५ वर्षाच्या कालावधीनंतर म्हाडा प्राधिकरणाच्या परवानगीची आवश्यकता नसल्याबाबतचा ठराव क्र.६४८०, दि. ०६/०५/२०१० मध्ये सुधारणा करुन पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याची विनंती केली होती. त्यानुषंगाने सदर ठराव म्हाडा प्राधिकरण स्तरावर मंजूर असल्याने, त्यामध्ये बदल करण्याबाबत पुनश्च: प्राधिकरणास ठराव मंजूर करुन घेणे योग्य राहिल, असे अभिप्राय कार्यकारी अभियंता,वांद्रे विभाग,मुंबई मंडळ म्हाडा यांनी दिले आहेत. त्यानुसार गृहनिर्माण विभागाकडून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दुकाने व विक्री केंद्रांवर होणारी अनियंत्रित गर्दी व चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती टाळण्यासाठी मानक कार्यपद्धती (SOP) तयार करण्याबाबत

**(२८) * २३८६३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील स्वस्त कपड्यांच्या जाहिरातीमुळे एका दुकानात मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होऊन तीन महिला चक्कर येऊन पडल्या असल्याचे दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोशल मीडियावरील जाहिराती, सवलती व ऑफर्समुळे दुकाने व विक्री केंद्रांमध्ये अचानक आणि अनियंत्रित गर्दी होत असून, महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या घटनांमध्ये गर्दी व्यवस्थापन, प्रवेश-निर्गमन व्यवस्था, सुरक्षा कर्मचारी, आपत्कालीन प्रतिसाद व पोलीस समन्वय याबाबत कोणतीही ठोस मानक कार्यपद्धती (SOP) नसल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित दुकान मालक, जाहिरातदार व स्थानिक प्रशासनाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने भविष्यात दुकाने, मॉल्स व विक्री केंद्रांमध्ये सवलत-जाहिरातींमुळे चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी अनिवार्य मानक कार्यपद्धती (SOP) तयार करून तिची कडक अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून गृह विभागास प्राप्त माहितीनुसार जवाहरनगर पोलिस ठाणे हद्दीमध्ये दि.४.१.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०२.०० वाजता "टेंज द फॅशन वर्ड" (Tenz the fashion word) ह्या कपड्याच्या दुकानात खरेदीकरिता आकर्षक सूट जाहीर केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दीगोंधळ झाल्याचे दिसून आले आहे. परंतू तथापि, सदर ठिकाणी तीन महिला चक्कर येऊन पडल्या या घटनेसंबंधी याबाबत कुठलीही माहीती मिळून आली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

पोलीस महासंचालक कार्यालयाकडून गृह विभागास प्राप्त माहितीनुसार गर्दीचे नियंत्रण व मोठ्या जमावाच्या व्यवस्थापनाबाबत केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या Bureau of Police Research & Development (BPR & D) कडून "Comprehensive Guidelines on Crowd Control & Mass Gathering Management" बाबत सर्व समावेशक मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.

डीजीपी/ आयजीपी कॉन्फरन्स २०२४ मधील शिफारशीनुसार BPR & D च्या वतीने "Learning Ourcomes of Successful Crowd Management Events" मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असून ती सर्व घटकांना पाठविण्यात आली आहेत.

तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून गर्दी दुर्घटना व चेंगराचेंगरी प्रतिबंधासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून गृह विभागास प्राप्त माहीतीनुसार सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित दोन दुकान मालक यांच्यावर जवाहर नगर पोलिस ठाणे येथे गुर क्र.५/२०२६ कलम १२५, ३(५) भान्यासं सह कलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमूद दुकानाचे शॉप ॲक्ट लायसन्स रद्द करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आरोपींविरुद्धच्या गुन्ह्याचा तपास करून दोषारोपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

(५) पोलीस महासंचालक कार्यालयाकडून व पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून गृह विभागास प्राप्त माहीतीनुसार भविष्यात दुकाने, मॉल्स व विक्री केंद्रामध्ये सवलत जाहिरातींमुळे चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी दुकाने, मॉल व विक्री केंद्रामधील संबंधीत दुकान मालकांना गर्दी टाळण्यासाठी आपात्कालीन परिस्थितीत सुरक्षा योजना उपलब्ध करून अतिरिक्त खबरदारी घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच सदर घटनेच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारची घटना टाळण्यासाठी समाजात चौकाचौकात लोकांना विशेष करून महिला, बालके व ज्येष्ठ नागरीक यांच्या भेटी घेवून तसेच पी.ए. सिस्टमद्वारे उद्घोषणा करून गर्दीच्या ठिकाणी जाताना काळजी घेण्याबाबत पोलीस विभागाकडून जनजागृती करण्यात येत आहे.

-----------------

## मौजे द्रोणागिरी नोड, नवघर (ता.उरण, जि.रायगड) येथे मे.इंडियन ऑईल ट्रॅकिंग लिमिटेड या कंपनीने सिडकोच्या जागेवर केलेले अतिक्रमण

**(२९)** * **२७२२४ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे द्रोणागिरी नोड, नवघर (ता.उरण, जि.रायगड) येथे मे.इंडियन ऑईल ट्रॅकिंग लिमिटेड या कंपनीने सिडकोच्या जागेवर अनधिकृतपणे कब्जा केला असुन सिडकोची परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र न घेता विनापरवाना सिडकोच्या जागेचा वापर करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनी सिडकोचे अधिमुल्यही भरत नसून विनापरवाना बेकायदेशीरपणे सन २००८ ते २०१९ या काळात नाफ्ता साठवणूकीचा व वाहतूकीचा व्यवसाय करीत असून याबाबत संबंधित अधिकारी संवेदनशील रसायनाची विनापरवाना व बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या कंपनीच्या वाहतूकीकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सिडको महामंडळाने मे. इंडियन ऑईल टँकिंग लि. या कंपनीस द्रोणागिरी येथील सेक्टर-१ मधील भूखंड क्र. १०१, क्षेत्र १,८३,९९०.४७ चौ.मी. हा भूखंड Bulk storage terminal for Petroleum products या वापराकरिता वाटप केला आहे. सदर भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा दि.१४/०८/१९९७ रोजी निष्पादित करण्यात आला आहे. मे.इंडियन ऑईल टँकिंग लि. कंपनीमार्फत दि.२१/०८/१९९८ रोजी बांधकाम परवानगी घेण्यात आली आहे. परंतु सदर भूखंडाकरिता भोगवटा प्रमाणपत्र अद्याप घेण्यात आलेले नाही.

मे.इंडियन ऑईल टँकिंग लि.ने मंजूर बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अतिरिक्त बांधकाम केलेले निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) आणि ५४(१) अंतर्गत दि. १९/१२/२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. मे.इंडियन ऑईल टॅंकिंग लि.ने उक्त भूखंडासाठी दि.१४/०८/२००३ पासून पुढील कालावधीसाठी देय अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क भरलेले नसून बांधकाम मुदतवाढ घेतलेली नाही.

दरम्यान, बांधकाम मुदतवाढीकरीता आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्कावर ५०% सूट देणेबाबत अभय योजना दि.३१/०३/२०२५ पर्यंत राबविण्यात आली होती. सदर अभय योजनेंतर्गत मे.इंडियन ऑईल टँकिंग लि. या कंपनीस दि.१८/०६/२०२४ व दि.०५/०३/२०२५ रोजीच्या नोटीसद्वारे अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क भरणा करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि, मे. इंडियन ऑईल टॅंकिंग लि. यांच्याकडून अभय योजनेंतर्गत अतिरिक्त भाडेपट्टा शुल्काचा भरणा करण्याबाबत अर्ज प्राप्त न झाल्याने दि.२३/०६/२०२५ व दि.२३/०९/२०२५ रोजी सिडकोमार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या दि. ०८/०७/२०२५ रोजीच्या अहवालानुसार, नाफ्ता साठवणूक व वाहतूक सदर व्यवसाय करण्यासाठी पेसो (PESO - पेट्रोलियम आणि विस्फोटक सुरक्षा संघटना), औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचानलाय व प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) यांची प्रामुख्याने परवानगी घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नाफ्ता आदेश (अनुज्ञापन), २००९, दि.१४/०१/२००९ मधील तरतूदींना अनुसरुन अनुज्ञप्तीचे नुतनीकरण झाल्यानंतर मे.इंडियन ऑईल टँकिंग लि., नवघर, ता.उरण यांचेकडून नियतकालीक अंतीम वापर प्रमाणपत्र वेळच्या वेळी घ्यावीत व तपासण्याही वेळोवेळी कराव्यात तसेच नाफ्ता विहित केलेल्या प्रयोजनासाठीच वापरला जात असल्याची खातरजमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभागाने दि.२८/०३/२०१९, दि.०१/०२/२०२१, दि.२०/०१/२०२३ व दि.२८/०३/२०२४ रोजी सूचना दिलेल्या आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांचेकडून नाफ्ता साठवणुक (टँकेज) अनुज्ञप्ती क्र.०८/२०२४ दरमहा एकुण १,४०,००० कि.ली. क्षमतेसाठी देण्यात आले असून सदर कंपनीस नाफ्ता टँकेज अनुज्ञप्तीची वैध मुदत दि.३१/०८/२०२६ पर्यंत आहे. नाफ्ता अनुज्ञप्तीनुसार नाफ्ता पदार्थांची साठवणुक करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड, पुणे, मुंबई शहरात किराणा मालाच्या दुकानांमधून निकृष्ट दर्जाच्या औषधांची होत असलेली विक्री

**(३०) * २७८७१ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील उद्योग नगरी पिंपरी चिंचवड शहरात झोपडपट्टी व दाट लोकवस्ती परिसरातील किराणा दुकाने, पान टपऱ्यांवर आणि चहाच्या स्टॉल वरून वेदनाशामक, सर्दी, खोकला, डोकेदुखी तसेच थंडी वाजणे यावरील औषध व गोळ्यांची सर्रासपणे विक्री केली जात असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड, पुणे, मुंबई शहरातील झोपडपट्टी परिसरातील किराणा मालाच्या दुकान आणि टपऱ्यांमधून विक्री केली जात असलेली औषधे ही निकृष्ट दर्जाची असून साठवणूक नियमांचे उल्लंघन करणारी असल्याने ड्रग्स अँड कॉस्मेटिक ॲक्ट प्रमाणे अन्न औषध प्रशासनामार्फत कारवाई करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाच्या बेकायदा औषधे विक्रीवर प्रतिबंध करून संबंधित विक्रेत्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड, पुणे व मुंबई शहरातील झोपडपट्टी परिसरातील किराणा दुकान आणि चहाच्या, पानाच्या टपऱ्यांव्दारे निकृष्ट दर्जाची तसेच, मुदत संपलेली औषधे स्वस्त दरात खरेदी करुन विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच, अशा प्रकारची कुठलीही तक्रार प्राप्त झाली नाही.

अन्न व औषध प्रशासनाद्वारे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ अंतर्गत परवानाधारकाच्या नियमित तपासण्या करण्यात येतात व ते परवान्याच्या अटींचे पालन करतात किंवा कसे, याची पडताळणी केली जाते. विनाप्रिस्क्रीप्शन औषध विक्री करणाऱ्या संस्थांवर अन्न व औषध प्रशासनातर्फे नियमित कायदेशीर कारवाई केली जाते. त्यानुसार, पुणे व बृहन्मुंबई विभागात माहे एप्रिल, २०२५ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| **विभाग** | **एकूण तपासण्या** | **निलंबन** | **रदद** |
|---|---|---|---|
| पुणे | ९५२ | २५३ | ७२ |
| बृहन्मुंबई | ८०० | ३०५ | ८७ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील अंबाझरी, फुटाळा आणि सोनेगाव यांसारख्या तलावांमध्ये सांडपाणी व अतिक्रमणामुळे प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(३१) * २३६६५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'ग्रीन सिटी' अशी ओळख असलेल्या नागपूर शहरातील अंबाझरी, फुटाळा आणि सोनेगाव यांसारख्या प्रमुख तलावांमध्ये जलपर्णी व वाढते अतिक्रमण यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषणामध्ये वाढ होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (NGT) नागपूर महापालिकेला तलावांच्या पुनरुज्जीवन आणि स्वच्छतेचा ठोस आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तलावांच्या मूळ समस्यांकडे व प्रदूषणाकडे दुर्लक्ष करून केवळ सौंदर्यीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करुन शासकीय निधीचा योग्य विनियोग होत नसल्याने तलावांमधील ऑक्सिजनची पातळी खालावली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, परिसरातील वस्त्यांमधील सांडपाणी आणि औद्योगिक रसायने थेट तलावात सोडली जात असून प्रदूषणाबाबतच्या नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याने नागरिकांचे व जलचर प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहरातील जल संतुलन राखण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) प्रभावीपणे राबवुन प्रदूषणास आळा घालण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहरातील अंबाझरी तलावातील जलपर्णीची वाढ झाल्याचे तसेच शहरातील प्रमुख तलावांत पाण्याची गुणवत्ता काही प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले आहे.
(२) हे खरे आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) दि.०३ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत फुटाळा तलावाच्या स्वच्छतेचा आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) नागपूर महानगरपालिकेने तलावाचे सौंदर्यीकरण प्रकल्प (टप्पा-१) अंतर्गत पर्यावरणीय संवर्धनाच्या दृष्टीने तलावाचे पुनरुज्जीवन, खोलीकरण, Recharge Shaft, भिंतीची व हिरवळ विषयक कामे पूर्ण केली आहेत.

नागपूर महानगरपालिकेकडून जलपर्णी काढण्याचे काम सातत्याने करण्यात येत असून यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याकरता निरी या संस्थेकडून तांत्रिक सहयोग घेण्यात येत आहे

औद्योगिक सांडपाणी थेट तलावात सोडले जात नाही. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या क्षेत्रातील रहिवासी वस्त्यांमधून तलावात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्याबाबत प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याबाबत कारवाई करण्यात येते. तलावांत कचरा टाकण्यास निर्बंध असून याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकामार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. तसेच फुटाळा तलावात सांडपाण्याचा निचरा होऊ नये याकरीता कश्मिरी बस्ती परिसरात मल जल वाहीनी टाकण्याचे काम करण्यात येत आहे.
(४) सद्यस्थितीत नागपूर महानगरपालिकेचे एकूण ३६० द.ल.लि. प्रति दिन व नागपूर सुधार प्रन्यासचे एकूण ६३.५ द.ल.लि. प्रति दिन असे एकूण ४२३.५ द.ल.लि. प्रति दिन सांडपाण्याचे शुध्दीकरण करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृद्धी महामार्गावरील अपघातांमधील मृतांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ झाल्याबाबत

**(३२) * २६७७० श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृद्धी महामार्गावरील अपघातांमधील मृतांमध्ये माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १६% वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-नागपूर महामार्गावरील मृतांची संख्या ९२ वरून १०७ वर पोहोचल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर वाहनाचा वेग नियंत्रित करण्यासाठी तसेच या महामार्गावर घडणाऱ्या प्राणघातक अपघातांची संख्या कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) गृह विभागाच्या प्राप्त अहवालानुसार समृध्दी महामार्गावर अपघातांमध्ये सन २०२४ मध्ये एकूण १२६ व्यक्तींचा दुर्देवी मृत्यू झालेला आहे. माहे जानेवारी, २०२४ ते सप्टेंबर, २०२४ पर्यंत एकूण ९२ व्यक्ती व माहे जानेवारी, २०२५ ते सप्टेंबर, २०२५ पर्यंत एकूण १०७ व्यक्तींचा दुर्देवी मृत्यु झालेला आहे.
(३) सद्य:स्थितीत अपघात टाळण्याच्यादृष्टीने महामार्गावर पोलीस विभाग व आर.टी.ओ. यांच्यामार्फत वाहनचालकांना समुपदेशन करण्यात येते. तसेच, महामार्गावरील इंटरचेंजजवळ प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसमध्ये अग्नीशमन यंत्र, ड्रायव्हिंग लायसंस इ.ची खातरजमा करुनच वाहने महामार्गावर सोडण्यात येतात. ज्या ठिकाणी जंगली प्राणी महामार्गावर येतात त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून जाळी लावण्यात आली आहे. महामार्गावर १५ ठिकाणी महामार्ग पोलीस केंद्र बांधण्यात येत आहेत.

इंटरसेप्टर व्हेईकल (Interceptor Vehicle) द्वारे वाहनांचा वेग मोजून, वेग मर्यादा न पाळणाऱ्या वाहन चालकांवर दंड आकारणी करून रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यात येतो. सदर महामार्गावर आवश्यक दिशादर्शक चिन्हे, सूचना फलके, माहिती फलके, घोष फलके, वेगमर्यादा दर्शक फलके लावणे, लेन मार्किंग करणे, कॅटआईज व डेलिनेटर्स, रम्बलिंग स्ट्रीप्स लावणे इ. उपाययोजना केलेल्या आहेत.

महामार्गाच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत १९२ सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून महामार्ग सुरक्षा पोलीसांना १५ वाहने खरेदी करून देण्यात आलेली आहेत.

तसेच सदर महामार्गावर रस्ते सुरक्षिततेच्यादृष्टीने अत्याधुनिक इंटेलिजंट ट्रांसपोर्टेशन सिस्टीम (ITS) यंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीत आहे. सदर यंत्रणेअंतर्गत वेग नियंत्रणासाठी दोन्ही मार्गिकांवर दर १० कि.मी. अंतरावर VIDES (Video Incident Detection and Enforcement System) ही आधुनिक प्रणाली कार्यान्वीत करण्यात येणार असून याव्दारे वेगमर्यादा ओलांडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. Vehicle Actuated Speed Display (VASD) दर २० कि.मी. अंतरावर बसविण्यात येत आहेत. प्रवाशांना / वाहनचालकांना त्यांच्या वाहनांचा वेग VASD वर पाहता येईल.

Veriable Message Sign (VMS) प्रत्येक प्रवेश / निर्गमनजवळ तसेच अपघात प्रवण (Black Spot) ठिकाणी बसविण्यात येतील. याव्दारे वाहतूक माहिती, मार्गदर्शक आणि इशारे चालकांना दिले जातील.

पीटीझेड कॅमेरे दर १ कि.मी. अंतरावर बसविण्यात येत आहेत. याव्दारे महामार्गावरील चुकीच्या बाजूने वाहन चालविणे व बेकायदेशीर पार्किंग ओळखून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सदर ITS यंत्रणा महामार्गाच्या पूर्ण लांबीमध्ये टप्याटप्याने कार्यान्वित करण्यात येणार असून त्यातील काही भाग माहे एप्रिल, २०२६ अखेर कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या (जि.पुणे) प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह भाडे वसुलीत झालेला गैरव्यवहार

**(३३) * २९१७१ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे (जि.पुणे) चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह भाड्याने देताना मनपाच्या क्रीडा विभागातील प्रशासन अधिकारी व १५ कर्मचाऱ्यांनी सुमारे ५० लाख ७० हजार ६२६ रुपयांचा अपहार केल्याचे लेखापरीक्षणात दिनांक २५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या कार्यक्रमाचे संस्थेकडून अनामत रक्कम, भाडे वसुली, सामान्य पावती, इतर भाडे व आकार पावती, भाडे वसुलीची परस्पर विल्हेवाट लावणे, तसेच इतर साहित्य साधनसामग्रीचे आर्थिक नुकसान झाल्याचा ठपका क्रीडा विभागातील कर्मचाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहाच्या भाडे वसुली प्रकरणातील गैरव्यवहाराची तज्ञ समितीमार्फत चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदरची बाब दि.०९/०८/२०२३ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

मुख्य लेखापरिक्षण विभागाकडील सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षण व सामान्य लेखापरिक्षण अहवालान्वये प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चिंचवड येथे वेळोवेळी नियुक्त लिपिक व मुख्य लिपिक तथा प्रभारी व्यवस्थापक यांच्याकडून मनपाची येणे वसूलपात्र व आक्षेपाधिन रक्कम मनपा कोषागारात जमा झाल्याचे दिसून येत नाही.

(३) याबाबत एका लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यास निलंबित करुन त्याची विभागीय चौकशी करण्यात आली आहे. तसेच मुख्य लेखापरिक्षण विभागाकडील सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षण व सामान्य लेखापरिक्षण अहवालान्वये आक्षेपाधीन व वसुलपात्र रक्कमे बाबत उपस्थित मुद्दयांच्या अनुषंगाने प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथील हजेरी रजिस्टर वरुन प्रत्यक्ष कार्यरत मुख्य लिपिक तथा प्रभारी व्यवस्थापक व लिपिक कर्मचारी यांचे कर्तव्य निहाय कालावधी निश्चित केला आहे.

सदर बाबत सामान्य लेखापरिक्षण व विशेष लेखापरिक्षण अहवालानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिस देऊन खुलासा मागवून त्यानुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.